


# भारत व्हिजन

## २०४७

संपादक

प्रा. (डॉ). अनिल पाटील

भारत व्हिजन २०४७

(Bharat Vision : 2047)

संपादक : प्रा.(डॉ.)अनिल पाटील

© प्रकाशक व संपादकाधीन

आवृत्ती : प्रथम आवृत्ती. २२ सप्टेंबर २०२४
(कर्मवीर भाऊराव पाटील जयंती)

ISBN Number : 978-93-94710-89-4

प्रकाशक: रूपाली चिघळीकर

रूपी पब्लिकेशन्स प्रा. लि.

'समता' 385/42 मोर्डी कॉलनी, काळभैरी रोड,

गडहिंग्लज जि. कोल्हापूर

Email: rupipublications@gmail.com

मोबाईल: 9822651377

मुद्रक : भारती डिजिटल प्रिंटींग प्रेस.

शाहूपुरी, कोल्हापूर.

अक्षरजुळणी : ज्ञानज्योत प्रोडक्शन, कोल्हापूर

मूल्य : रु ३९९/-

सदर पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनाने फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत. या पुस्तकातील सर्व मतमतांतरे लेखकांचे आहेत. त्यास प्रकाशक व संपादक जबाबदार राहणार नाहीत.

# अनुक्रमणिका


| अक्र | लेख | लेखक | पान क्र |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण कालचे व उद्याचे | प्रा. (डॉ.)अनिल पाटील | ०१ |
| २ | विकसीत भारतासाठी पाणी बचत | डॉ. ज्ञानराजा चिघळीकर | ०५ |
| ३. | माझ्या कल्पनेतील भारत | डॉ. शर्मिला घाटगे | १४ |
| ४. | भारताचे अर्थविश्व | डॉ. काशिनाथ तनंगे | २० |
| ५. | माझा आहार माझे आरोग्य | डॉ. गंगासागर चोले | ३६ |
| ६. | शोध भारताचा | डॉ. सुरेश चव्हाण | ४२ |
| ७. | व्हिजन भारत @२०४७ एक दृष्टिक्षेप | धर्मवीर क्षीरसागर | ५६ |
| ८. | विकसित भारतासाठी ग्रंथालयांची भूमिका आणि आव्हाने | समीर कुलकर्णी | ६७ |
| ९. | भारतीय शेती काल, आज आणि उद्या | कविता पोळ | ७४ |
| १०. | लोप पावत चाललेले संस्कार | क्रांती शिवणे | ८० |
| ११ | ई-कॉमर्स व आर्टिफिशियल इंटेलिजन्स | श्रद्धा बनसोडे | ८५ |
| १२ | भारतासाठी जीडीपी आणि तंत्रज्ञान | पूजा कोचरी | ९४ |
| १३ | भारत २०४७ पर्यावरण संवर्धन | डॉ. संजीवनी पाटील | १०० |
| १४ | भूमंडलीकरण और भारतीय हिंदी साहित्य | शितल डवरी | १०६ |

# शोध भारताचा

डॉ. सुरेश चव्हाण

---

अखिल मानव जातीच्या इतिहासात भारत देशाला विशेष महत्त्व आहे. या देशाला प्राचीन काळापासूनचा समृद्ध वारसा लाभला आहे. शेकडो वर्षांच्या संघर्षानंतर १९४७ रोजी भारत देश ब्रिटिशांच्या पारतंत्र्यातून मुक्त झाला. स्वातंत्र्यलढ्याच्या निमित्ताने तमाम भारतीयांनी दिलेल्या लढ्याला व पराक्रमाला इतिहासात खरोखरच तोड नाही. २०४७ रोजी स्वतंत्र भारताला शंभर वर्षे पूर्ण होतील. तेव्हा नुकताच अमृत महोत्सव साजरा केलेला भारत देश २०४७ रोजी शतक साजरा करणारा जगातील एक महत्त्वपूर्ण देश असणार आहे. वर्तमान काळाच्या पार्श्वभूमीवर देशाच्या भूतकाळावर नजर टाकली असता भविष्यकाळातील भारताचे एक चित्र डोळ्यासमोर उभे राहते. मानवी जीवनाच्या वाटचालीत महत्त्वपूर्ण योगदान देणारा भारत, विविधतेने नटलेला भारत, सुजलाम सुफलाम भारत, खेड्यांचा-मंदिरांचा देश म्हणून ओळखला जाणारा भारत, नैतिक मूल्यांवर आधारलेल्या संस्कृतिचा भारत आणि वर्तमान काळात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक, तंत्रज्ञान.. अशा विविध क्षेत्रात अमुलाग्र बदल करून स्वतंत्र ओळख निर्माण करणारा भारत महासत्तेचे स्वप्न पूर्ण करणार का ? असा प्रश्नही निर्माण होतो. तेव्हा स्वातंत्र्याचे शतक साजरा करणारा भारत २०४७ मध्ये कसा असू शकेल याचे विवेचन सदरच्या लेखामधून करण्याचा प्रयत्न केला आहे.

ज्या देशाला जास्त इतिहास त्या देशाचा जास्त विकास असे म्हटले जाते, याला भारतही अपवाद नाही. इतिहास ही संकल्पना मुळातच अतिशय व्यापक स्वरूपाची आहे. इतिहास म्हणजे भूतकाळाचा अभ्यास

होय. वर्तमान काळात घडणारी प्रत्येक घटना शेवटी इतिहास या ज्ञानशाखेत समाविष्ट होत असते. म्हणूनच इतिहास म्हणजे मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी ज्ञानशाखा म्हणून ओळखली जाते. इतिहासाचे महत्त्व हजारो वर्षांच्या मानवी जीवनातील उत्क्रांतीच्या वाटचालीत अधोरेखित झालेले आहे. कारण वर्तमान काळात जीवन जगणाऱ्या प्रत्येक मानवाला भूतकाळाचा (इतिहासाचा) संदर्भ घेतल्याशिवाय भविष्याचा अचूक वेध कधीच घेता येत नसतो. एकूणच अनेक अर्थांनी इतिहास हा मानवाचा मार्गदर्शक असतो, प्रेरणा देणारा असतो. म्हणूनच एक इतिहासकार म्हणतो की, ज्या देशाला आपला इतिहास माहीत नसतो तो देश जिवंत असूनही मृतासमान असतो. यावरून इतिहासाचे महत्व लक्षात येते.

वर्तमान भारत :

विषयाच्या अनुषंगाने वर्तमान काळातील ऐतिहासिक भारत समजून घेतल्याशिवाय भविष्यकाळातील म्हणजेच २०४७ मधील भारताचा शोध घेता येणार नाही तथा विवेचन करता येणार नाही. मुळात माणूस हा इतिहासाच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू असल्याने मानवी जीवनाच्या विविध अंगांचा ऐतिहासिक आढावा घेणे म्हणजेच ऐतिहासिक दृष्टिकोनातून भारत समजून घेणे होय. सद्यस्थितीत भारताचे आकलन केले असता कभी खुशी कभी गम हे वास्तव डोळ्यासमोर येते. अर्थात सध्याच्या भारताचे विश्लेषण करताना या देशाचा एक नागरिक म्हणून दोन बाजू डोळ्यासमोर स्पष्टपणे उभ्या राहतात. पैकी एक म्हणजे विकासाची चांगली तथा विधायक बाजू आणि दुसरी म्हणजे घातक तथा मन सुन्न करणारी बाजू होय. म्हणजेच काय तर सध्या एका बाजूला भारताने प्रचंड मोठी प्रगती केलेली दिसून येते तर दुसऱ्या बाजूला प्रचंड मोठी अधोगती झाल्याचे पहावयास मिळते.

वर्तमान काळातील भारत देशाने मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये क्रांतिकारक स्वरूपाची प्रगती केल्याचे दिसून येते. नव्या तंत्रज्ञानामुळे फार मोठी क्रांती होऊन अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टी मानवाला सहज शक्य होऊ लागल्या आहेत. माणसाची जागा यंत्रमानवाने घेतल्यामुळे त्याच यंत्रमानवाच्या माध्यमातून मानव हर एक प्रकारचे काम करू लागला आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाची क्रांती, हरितक्रांती, श्वेतक्रांती, दळणवळणातील क्रांती.. यासारख्या संकल्पना उदयास येऊन मानवी जीवनच बदलून गेले आहे. त्यामुळे संगणक, मोबाईल, इंटरनेट, मेसेज, व्हाटस अप, इंस्टाग्राम, ट्विटर, चॅटिंग हे आपल्या रोजच्या जगण्याचाच भाग बनले आहेत. गोष्टीतल्या चांदोबाला साद घालता घालता भारताने चंद्रमोहीम यशस्वी करून प्रत्यक्ष चंद्रावर पाऊल ठेवण्यात यश मिळवले आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, रस्ते, वाहतूक, दळणवळण, व्यापार, उद्योग, पर्यटन, शिक्षण, बांधकाम, शेती, औजारे, बि बियाणे, जलव्यवस्थापन , लष्कर, मिडीया, उर्जा, करमणूक, कला, क्रीडा, संस्कृती...अशा असंख्य क्षेत्रांमध्ये अमुलाग्र विकास घडवून आणलेल्या भारताने जागतिक स्तरावर आपल्या प्रगतीचा स्वतंत्र ठसा उमटविला आहे. एकूणच आज प्रगतीच्या लाटेवर स्वार झालेल्या भारताने भौतिक दृष्टिकोनातून फार मोठी प्रगती केली असल्याने भारतीयांचे जीवन सुसाह्य झाले आहे. म्हणूनच या डिजिटल किंवा तंत्रज्ञानाच्या युगात वावरणाऱ्या वर्तमान काळातील भारतीयांना, जग मेरे मुठ्ठी में है ! हा आत्मविश्वास आल्याचे दिसून येते. एवढेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये ही भारताने मोठी झेप घेतलेली असून अनेक आंतरराष्ट्रीय स्तरावरील घटनांमध्ये/ प्रसंगांमध्ये भारताची भूमिका निर्णायक मानली जाते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध प्रकारच्या महत्त्वपूर्ण योगदानामुळे अलीकडच्या कालखंडामध्ये भारत ही एक जागतिक स्तरावरील महासत्ता म्हणून ओळखली जाऊ लागली आहे.

विद्यमान भारताला विश्वगुरू म्हणून ओळखले जाऊ लागल्याने जगभरातील अनेक देश एक आशेचा किरण म्हणून भारताच्या भूमिकेकडे पाहू लागले आहेत. यावरून भारत देशाचा आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्त्व व दबदबा स्पष्ट होतो. एकूणच विविध क्षेत्रातील अविस्मरणीय प्रगती, अनेक प्रकारचा विकास, नवनवीन संकल्पना व त्यावरील उपाययोजना, भारतीयांना सतत भेडसवणाऱ्या अनेक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी टाकली जाणारी पावले, मूलभूत स्वरूपाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी केले जाणारे प्रयत्न, शाश्वत विकासाच्या दृष्टिकोनातून केले जाणारे विशेष प्रयत्न, अत्यावश्यक असणाऱ्या सोयी सुविधा आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण केलेले विशेष स्थान इत्यादी वरून सद्यस्थितीत आपला देश विकासाच्या रोखाने प्रगतीचे एक पाऊल पुढे टाकत आहे ही वर्तमान काळातील भारताची सकारात्मक व चांगली बाजू आहे यात शंका नाही.

मात्र सद्यस्थितीतील भारताची दुसरी बाजू ही तितकीच भयंकर, गंभीर, विचित्र, वेदनादायी व मन अस्वस्थ करणारी आहे. बडा घर पोकळ वासा.. या म्हणीप्रमाणे एका बाजूला भौतिक सुख सोयींनी विकसित झालेल्या, प्रगतीपथावर असणाऱ्या समकालीन भारताची दुसरी बाजू ही तेवढीच निराशजनक व मानवी जीवनाला बाधा पोहोचवणारी आहे. जशे की, प्रचंड दारिद्र्य, बेकारी, टोकाची विषमता, अमर्याद भ्रष्टाचार, जुलूम, अन्याय अत्याचार, राजकारणात ढासळलेली नितीमत्ता, नैतिक मूल्यांचा ऱ्हास, हरवत चाललेली ग्रामसंस्कृती, मानवतेची पायमल्ली, फसवा फसवी, दिशाभूल, नैसर्गिक साधन संपत्तीची हानी, स्वार्थी भावना, पर्यटनाच्या नावाखाली चालत असलेला काळाबाजार, प्रदूषण, बिघडत चाललेले आरोग्य, बिनधास्त होणारे खून, मारामाऱ्या, दहशतवाद, नक्षलवाद , भेदभाव, युद्धसंघर्ष आणि जीवघेणी स्पर्धा ही त्याची अत्यंत

बोलकी उदाहरणे आहेत. सद्यस्थितीतील भारत देशाचा बारकाईने अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत पावला पावलाला संकटांचा सामना करावा लागतो. घरातून बाहेर पडलेली स्त्री, पुरुष, अथवा लहान मुले संध्याकाळी सुरक्षित घरी पोहोचतील की नाही याची शाश्वती देता येत नाही. प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या आपल्या देशात मुळातच दारिद्र्य व बेकारी होती. पण एका बाजूला भरमसाठ शिक्षण संस्थांची खिरापत करून लाखो विद्यार्थी पदवीधर करायचे आणि दुसऱ्या बाजूला तांत्रिक कारणे देऊन नोकर भरती थांबवायची या घातक धोरणामुळे बेकारी व दारिद्र्य यामध्ये कैक पटीने वाढ झाल्याचे दिसते. शे-दोनशे पदांच्या पोलीस भरतीसाठी लाख- दोन लाख उमेदवारांचे अर्ज येतात आणि उन्हातान्हात होणाऱ्या ग्राउंड वरील परीक्षेसाठी त्यामध्ये सात-आठ महिन्यांची गरोदर स्त्री, उच्च विद्याविभूषित विद्यार्थी आशेने सहभागी होतात यावरून बेकारीची धग लक्षात येते. कधी नव्हे तेवढी टोकाची विषमता वर्तमान काळातील भारतामध्ये जाणवते. कारण एका बाजूला टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी अन्नाची भीक मागणारी व दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असणारी पिढी आहे तर दुसऱ्या बाजूला अन्नाची नासाडी करणारी व खरकटं अन्न गटारात टाकणारी पिढी आहे. विद्वानांच्या मते भारताच्या एकूण संपत्ती पैकी जवळपास निम्मी संपत्ती एका एस टी बसमध्ये बसतील एवढ्या अल्प लोकांकडे आहे तर उर्वरित निम्मी संपत्ती उरलेल्या तमाम भारतीयांकडे आहे. यावरून विषमतेची धार लक्षात येते. दिल्लीपासून ते अगदी गल्लीपर्यंत सर्रास चालणाऱ्या भ्रष्टाचाराने तर सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत. सद्यस्थितीत जणू काही भ्रष्टाचार करण्याची फॅशनच निर्माण झालेली असून भ्रष्टाचार करणे हे प्रतिष्ठेचे मानले जाऊ लागल्याचे दिसते. भ्रष्टाचाराच्या दलदलित अडकलेल्या वर्तमान भारताचे वर्णन करताना एक कवी म्हणतो की,

*रेल्वेचे रूळच आता इंजिनला छळू लागले*
*आपले कुणीच नसते हे डब्यांनाही कळू लागले.*
*वर्दी असो की पोशाख सारखेच खिशे आहेत*
*साऱ्यांच्याच टोपींवर नोटांचीच पिसे आहेत.*
*गढूळलेल्या पाण्यातच गुळगुळीत गोठे आहेत*
*हात असो कुणाचाही घोटाळ्यांचीच बोटे आहेत.*

नैतिक मूल्यांवर आधारलेल्या भारतीय संस्कृतीवर परकीय संस्कृतीचे आक्रमण झाल्याने नैतिक मूल्यांचे एवढे अध:पतन झाले आहे की, माणूस माणसासीच माणसासारखा वागताना दिसत नाही. खून, मारामाऱ्या, लैंगिक अत्याचार, ईर्षा यांचे सत्र सतत चालू आहे. कोणत्याही वर्तमान पत्रावर एक नजर टाकली असता मन अस्वस्थ करणाऱ्या अनेक बातम्या पाहून नैतिक मूल्यांचे किती अध:पतन झाले आहे हे लक्षात येते. लैंगिक अत्याचाराने तर कळस गाठलेला असून तीन वर्षाच्या मुलीवर जेव्हा लैंगिक अत्याचार होतो तेव्हा आपल्या देशाची विदारक अवस्था स्पष्ट होते. बदलत जाणाऱ्या जीवन शैलीमुळे फास्ट फुडच्या सध्याच्या जमान्यात देशातील जनतेची आरोग्याच्या दृष्टिकोनातून प्रचंड हानी झाल्याचे पहावयास मिळते. पूर्वी आपल्याच देशात शंभर वर्षाहून अधिक वर्षे जगणारा माणूस आज पन्नास वर्षे सुद्धा आरोग्य संपन्न जगताना दिसत नाही. खरं म्हणजे आयुष्यभर पैसे कमावण्याच्या नादात माणूस आपलं आरोग्य गमावून बसतो. आणि गेलेलं आरोग्य पुन्हा कमावण्याच्या नादात मिळवलेला सर्व पैसा गमावून बसतो. परिणामी सरते शेवटी आयुष्याच्या सायंकाळी त्याच्या हातात ना आरोग्य असते ना संपत्ती असते हे वास्तव चित्र बरेच काही सांगून जाते. विशेष म्हणजे विज्ञानाने देशा-देशातील, शहरा-शहरातील, गावा-गावातील आणि गल्ली-गल्लीतील अंतर मोजण्याचे तंत्रज्ञान आणले पण अद्यापही माणसाच्या मना-मनातील अंतर

मोजण्याचे तंत्रज्ञान विकसित झाले नाही हे वास्तव आहे. परिणामी मानवतेचाच अंत होऊन अमानवी कृत्यांनी मानवी जीवन वेढलेले दिसून येते. आदर्शवाद व नैतिक मूल्यांच्या भक्कम पायावर उभ्या असणाऱ्या भारतीय संस्कृतीमध्येच वर्तमान काळात नैतिक मूल्यांची पायमल्ली होताना दिसत आहे. विश्वास व विकास यावर चालणाऱ्या राजकारणात तर सध्यस्थितीत एक नवीन पॅटर्नच तयार झाला आहे. सत्तेच्या लालसेपोटी फोडा फोडीच्या राजकारणाने नैतिकता धाब्यावर बसवून समाज विकासावरच प्रहार करून हुकूमशाही कडे वाटचाल केलेली दिसते. त्यामुळे मूलभूत गरजांचा भला मोठा प्रश्न असतानाही विश्वगुरूची संकल्पना बुचकळ्यात टाकणारी वाटते. थोडक्यात नवभारताच्या संकल्पनेत व महासत्तेच्या स्वप्नात वावरणारा वर्तमान काळातील भारत आतून किती पोखरलेला आहे याचीच जाणीव होते.

२०४७ चा ऐतिहासिक भारत:

विवेचनाचा मुख्य विषय २०४७ चा ऐतिहासिक भारत कसा असणार आहे हा असल्याने ,वरील प्रकारच्या विविध अंगांनी वर्तमान काळातील भारत समजून घेतल्यानंतर निश्चितच प्राप्त समकालीन परिस्थितीच्या आधारे आपणाला २०४७ चा भारत कसा असेल त्याचा अंदाज बांधता येतो. विश्लेषणाच्या अनुषंगाने विचार करता, जश्या नाण्याला दोन बाजू असतात तश्याच २०४७ मधील भारताच्या स्थितीलाही दोन बाजू असणार आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. अर्थात सर्वात महत्त्वाचे म्हणजे २०४७ मधील भारत हा स्वातंत्र्याची ऐतिहासिक १०० वर्षे पूर्ण करणारा म्हणजेच स्वातंत्र्याचे शतक साजरा करणारा जगातील एक महत्त्वपूर्ण देश असणार आहे. २०४७ चा भारत हा अनेक अर्थानी नवभारत आपणास पाहता येणार आहे. स्वातंत्र्याचे शतक साजरे करणाऱ्या भविष्यातील भारतात राहणारा समाज हा अधिक सक्षम, ज्ञानी, अनुभवी

आणि यंत्रमानवासारखा अधिक प्रगतलेला असणार आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, व्यवसाय, उद्योग, दळणवळण, व्यापार, तंत्रज्ञान, वैद्यकीय सेवा, शेती, शिक्षण, प्रवास, पर्यटन, रूढी, परंपरा, जात, धर्म, सामाजिक रचना, साहित्य, विवाह पद्धती, नोकरी, खाद्य संस्कृती, आहार, तंत्रज्ञानाचा वापर, चळवळी... यासारख्या मानवी जीवनाच्या जवळजवळ सर्वच क्षेत्रात अमुलाग्र बदल झालेला असणार आहे यात शंका नाही.

वर्तमान काळाततील सभोवतालच्या परिस्थितीचे आकलन करून तीच्या तुलनेत २०४७ मधील भारताचे वर्णन करताना, ज्याप्रमाणे भूतकाळातील काही गोष्टींवर आपला विश्वास बसत नाही. त्याप्रमाणे भविष्य काळातीलही काही गोष्टींवर आपला खरोखरच विश्वास बसणार नाही. कारण अनेक अविस्मरनीय गोष्टी हेच २०४७ मधील ऐतिहासिक भारताचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असणार असून ते आपणाला नाकारता येणार नाही. विज्ञान व तंत्रज्ञानातील नवनवीन शोधांमुळे मानवी जीवन अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण असणार आहे. २०४७ मधील भारताचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अन्वयार्थ लावत असताना भारत हे एक महासत्ता म्हणून गणले जाणारे महान राष्ट्र म्हणून ओळखले जाईल. त्या महान राष्ट्राला इतिहासाचा प्रगल्भ ऐतिहासिक वारसा लाभलेला असणार आहे. याशिवाय विविधतेने नटलेला, नैसर्गिक साधन संपत्तीने परिपूर्ण असणारा, विज्ञान व तंत्रज्ञानामध्ये मोठी प्रगती केलेला, लष्करीदृष्ट्या स्वतःला सिद्ध करणारा, अनेक क्षेत्रामध्ये स्वतंत्रपणे वाटचाल करणारा, संपूर्ण जगाला मानवतेचा, शांततेचा व सहकार्याचा संदेश देणारा आणि गरजू देशांना सहकार्य करणारा देश म्हणून ओळख असणार आहे. परकीय संस्कृतीचे कितीही आक्रमण झाले तरी तिचा अतिरेक झाल्याचे लक्षात आल्याने भारत देश स्वसंस्कृतीला, स्वहिताला आणि स्वसंरक्षणाला विशेष स्थान देणार आहे.

याशिवाय महापुरुषांच्या विचारधारेतून आचरण करणारा तत्कालीन भारत मानवतेला काळीमा फासणाऱ्या अनेक वाईट रूढी ,परंपरांचा द्वेष करून जात, धर्म, पंथ विरहित समानतेवर आधारलेल्या समाज निर्मितीवर विशेष भर दिला जाईल. त्यामुळे वर्तमान स्थिती मधील रोटी बेटी व्यवहार, विवाह पद्धती, वर्णव्यवस्था, उच्च - निचतेची भावना, माझाच धर्म श्रेष्ठ यासारख्या निरर्थक बाबी जवळजवळ संपुष्टात आल्याचे पहावयास मिळेल. सर्वच जाती-धर्माचे लोक एकमेकांचा माणूस म्हणून स्वीकार करून सहकार्याच्या भावनेने वाटचाल करताना दिसतील. ग्रामीण संस्कृती पेक्षा शहरी संस्कृतीला श्रेष्ठ मानणारा वर्तमान काळातील समाज २०४७ मधील भारतात असणार नाही तर त्या ऐवजी ग्रामाकडे चला तथा गड्या माझा गावचं भारी या तत्त्वावर विश्वास बसल्याने प्राचीन भारतातील स्वयंपूर्ण ग्रामीण जीवनाची ग्राम संस्कृती विकसित झालेली असणार आहे. त्यामुळे गावा गावातून आज लोकांचे तांडेच्या तांडे शहरात येऊन स्थायिक होत आहेत पण भविष्यात ते न राहता शहरातील तांडे च्या तांडे पुन्हा ग्रामाकडे जाऊन स्थिरावलेले दिसून येतील. २०४७ मधील भारतीय समाजाचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे तत्कालीन समाज उत्तम आरोग्याला प्राधान्य देणारा असणार आहे. पण तरीसुद्धा सध्याच्या तुलनेत भारतीयांचे आयुर्मान निश्चितच कमी झाल्याचे पहावयास मिळेल.

ऐतिहासिक दृष्टिकोनातून २०४७ च्या भारताचा विचार केल्यास इतिहासाच्या ज्ञानशाखेत अमुलाग्र बदल झालेले पहावयास मिळतील. जसे की, इतिहास या संकल्पनेची व्याप्ती वाढून इतिहास लेखनातील संशोधनात नव नवे प्रवाह येतील. यामध्ये वंचितांचा इतिहास, स्त्रीवादी इतिहास, स्थानिक इतिहास, शेतकऱ्यांचा इतिहास, कामगारांचा इतिहास, व्यापाराचा इतिहास, सूक्ष्म इतिहास, सांस्कृतिक इतिहास, प्रशासकीय इतिहास, तुलनात्मक इतिहास, तळागाळातील सर्वसामान्यांचा इतिहास

यासारख्या अनेक घटकांचा नव्या दृष्टीने/आयामाने ऐतिहासिक मांडणी करण्याचा अनेक इतिहास संशोधकांकडून प्रयत्न केला जाईल. याशिवाय भूतकाळातील ऐतिहासिक घडामोडींवर प्रकाश टाकत असताना संदर्भ साधनांना विशेष महत्त्व असते म्हणूनच सेनबॉस व लॉन्जिलॉस असे म्हणतात की, कागदपत्रे नसतील तर इतिहास नाही. सद्यस्थितीत ऐतिहासिक संदर्भ साधनांचा प्रचंड मोठा अभाव आढळून येतो. किंबहुना संदर्भ साधनांच्या अभावामुळे अनेक महत्त्वपूर्ण संशोधने पूर्ण करता येत नाहीत. ही वर्तमान काळातील इतिहास लेखनाची सर्वात मोठी मर्यादा आहे. पण भविष्यात मात्र मागील शतक भरातील भारताच्या प्रदीर्घ सर्वांगीण वाटचालीत निर्माण झालेली व जतन करून ठेवण्यात आलेली विविध प्रकारची विपुल प्रमाणात संदर्भ साधने सहजरीत्या उपलब्ध होऊ शकतील. त्यामुळे निश्चितच अतिशय सूक्ष्म स्वरूपाचे मानवी जीवनातील छोट्या-मोठ्या परिणामकारक घटना, प्रसंग व्यक्ती, स्थळ, चळवळी, आंदोलने इत्यादींचे शास्त्रीय पद्धतीचे ऐतिहासिक संशोधन करणे सोयीस्कर होईल. शिवाय भूतकाळाच्या तुलनेत वर्तमान काळात भारतीय समाजामध्ये संशोधनाच्या अनुषंगाने सकारात्मक जनजागृती झाली असल्याने भविष्यात ऐतिहासिक संशोधनाच्या क्षेत्रात भारत देशाची तथापि भारतीय संशोधकांची एक प्रकारची मक्तेदारी निर्माण होऊ शकेल असा विश्वास वाटतो.

ऐतिहासिक पर्यटन हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळेच अलीकडच्या कालखंडामध्ये ऐतिहासिक पर्यटनात प्रचंड मोठी वाढ झालेली दिसून येते. मुळातच माणूस हा आनंद व सुख मिळवण्यासाठी ऐतिहासिक पर्यटन करत असतो. शिवाय वर्तमान कालखंडातील धावपळीच्या व धामधुमीच्या जीवन पद्धतीमुळे मानवाला विरंगुळ्या ची नितांत गरज वाटू लागली असल्यामुळे ऐतिहासिक

पर्यटनाकडे समाजाचा कल वाढलेला दिसतो. तसे पाहता प्राचीन काळापासूनच मानवी जीवनात ऐतिहासिक पर्यटनाला विशेष महत्त्व आहेच परंतु भारताच्या संदर्भात विचार केल्यास वर्तमान काळातील भारतीय ऐतिहासिक पर्यटनाचा विचार करता भारत हा महत्त्वाचा देश ठरतो. कारण देशाच्या एकूण पर्यटनातील ऐतिहासिक पर्यटनाचा वाटा सर्वाधिक असल्याचे सर्वेक्षणातून स्पष्ट झालेले आहे. वर्तमान काळातील भारताच्या ऐतिहासिक पर्यटनामध्ये निसर्गाने नटलेल्या पर्वतरांगा, बारमाही वाहणाऱ्या विस्तीर्ण नद्या, घाट, वरदान ठरलेली जलाशये, स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना असणारी स्मारके, लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असणारी प्राचीन मंदिरे, जगप्रसिद्ध कलेचा अविष्कार असणाऱ्या लेण्या, निसर्गाने समृद्ध असणारी अभयारण्ये, इतिहासाचे साक्षीदार असणारे गडकोट, पराक्रमाची साक्ष देणारी स्मारके, कर्तुत्वसंपन्न व्यक्तींच्या समाध्या, भूतकाळात आपल्याच पूर्वजांनी केलेल्या पराक्रमाची साक्ष देणारी संग्रहालये, दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असणारे घाटमार्ग, अथांग समुद्राचे व निसर्गाने नटलेले समुद्रकिनारे अशी असंख्य वारसास्थळे ही ऐतिहासिक पर्यटनाची बोलकी उदाहरणेच आहेत. या भारतीय पर्यटन स्थळांचे महत्त्व २०४७ मध्ये अधिक वाढले जाऊन भारत हा जगातील ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा महत्त्वाचा देश म्हणून ओळखला जाईल. शिवाय जागतिक ऐतिहासिक पर्यटनामध्ये भारताच्या पर्यटनाचे विशेषतः ऐतिहासिक पर्यटनाचे महत्त्वपूर्ण योगदान राहील. तथापि भारत हा ऐतिहासिक पर्यटनाचा देश म्हणूनच ओळखला जाईल. ऐतिहासिक पर्यटनाचा सकारात्मक परिणाम म्हणून भारतीय व्यापार व उद्योगांमध्ये प्रचंड मोठी वाढ झालेली असेल. पर्यटनाच्या निमित्ताने फार मोठी आर्थिक उलाढाल होत असल्याने रोजगार, दळणवळण, वाहतुकीचा व्यवसाय, व्यापार , उद्योग यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये क्रांतिकारक स्वरूपाची वाढ

होईल. ही असंख्य ऐतिहासिक पर्यटन स्थळे सर्व भारतीयांच्या उज्वल व समृद्ध इतिहासाची बोलकी उदाहरणे तथा प्रतीके असल्यामुळे ती तमाम भारतीयांना अभिमान वाटणारी, प्रेरणा देणारी, मार्गदर्शन करणारी व ऊर्जा देणारी बलस्थाने होतील यात शंका नाही.

वर्तमान काळातील भारताच्या चौफेर परिस्थितीचे अवलोकन करून २०४७ मधील भारताचे अनुमान लावत असताना ज्याप्रमाणे सद्यस्थितीमध्ये सकारात्मक व नकारात्मक या दोन्ही बाजू विचारात घ्याव्या लागतात. त्याप्रमाणे २०४७ मधील भारताचे विवेचन करतानाही त्या दोन्ही बाजू विचारात घ्याव्या लागणार आहेत. अनेक क्षेत्रात परिवर्तनाची क्रांती करणाऱ्या भविष्यातील भारताच्या अनेक गोष्टींवर वर्तमान काळातील माणसाचा विश्वासच बसणार नाही. कारण सकारात्मक अर्थाने विचार केल्यास ज्याप्रमाणे मागच्या ५० वर्षांपूर्वी भारतीयांनी कल्पना सुद्धा न केलेल्या अनेक गोष्टी सध्या पहावयास मिळतात. त्याप्रमाणे वर्तमान काळात आपण कल्पनाही करू न शकणाऱ्या अनेक गोष्टी २०४७ च्या भारतामध्ये घडलेल्या असणार आहेत हे मात्र निश्चित. खऱ्या अर्थाने भारतीयांनी भूतकाळातील इतिहासातून योग्य तो धडा घेऊन भविष्यकाळात वाटचाल केल्यास २०४७ मधील भारत हा स्वातंत्र्याचे शतक साजरा करणारा, एक नवभारत, महासत्ता असणारा भारत, संपूर्ण जगाचे नेतृत्व करणारा भारत, मानवतेचा संदेश देणारा भारत, विश्वगुरु असणारा भारत, नवयुवकांचा भारत, स्वयंपूर्ण ग्रामीण जीवन असणारा भारत, मंदिरांचा भारत, साधुसंतांचा भारत, गड किल्ल्यांचा भारत, निसर्ग सौंदर्याने नटलेला भारत, तंत्रज्ञानात अमुलाग्र प्रगती केलेला भारत... अशा विविध अंगांनी भारत ओळखला जाईल यांत तिळमात्र शंका नाही. पण नकारात्मक बाजूने विचार केल्यास वर्तमान काळातील परिस्थिती चा विचार करता भारताची वाटचाल विदारक स्वरूपाची जाणवते. कारण

सद्यस्थितीच्या भारताचे वर्णन करताना एका कवीने केलेले वर्णन बरेच काही सांगून जाते.

*लोकशाही नावाने ठोकशाही राबवत आहोत, खंडणीसाठी अपहरण*
*करतो आहोत, माणसे जनावरासारखी वागवत आहोत,*
*तरीही आम्ही श्रेष्ठ आहोत !*
*लोकसंख्या वाढवण्यात गर्क आहोत, बेकारीच्या वेड्यात अडकलो*
*आहोत, भ्रष्टाचार सतत वाढवत आहोत,*
*तरीही आम्ही श्रेष्ठ आहोत !*
*वटपौर्णिमेला पुजत आहोत, मॅचिंग मंगळसूत्र घालत आहोत,*
*बॉयकॉटचा अभिमान बाळगत आहोत,*
*तरीही आम्ही श्रेष्ठ आहोत !*

याच पद्धतीने भूतकाळातील इतिहासातून कोणताही धडा न घेता अहंभावी, गर्विष्ठ व दूषित भावनेने आपण वाटचाल केल्यास २०४७ चा भारत एका महान क्रांतीच्या उंबरठ्यावर स्वार झालेला असेल यात शंकाच नाही. पण ती क्रांती भारताला कदापी परवडणारी असणार नाही. असमानता, बेकारी, विषमता, भ्रष्टाचार, मानवतेचा अंत पाहणारी, राज्यकर्त्यांना चिरडून टाकणारी, नैतिक मूल्ये पायदळी तुडवणारी, सर्वसामान्यांचे सार्वभौमत्व सिद्ध करणारी, अन्याय करणाऱ्यांना चिरडून टाकणारी, नव्या मानवतेला जन्म देणारी, माणसाने माणसाशी माणसासारखे वागले पाहिजे या तत्त्वाला घेऊन वाटचाल करणारी, सर्वांना समान न्याय देणारी असणार आहे. म्हणजेच १९४७ ची भारताची क्रांती ही परकीयांच्या पारतंत्र्यातून देशाला मुक्त करण्यासाठी झालेली होती. तर २०४७ मधील भारताची क्रांती ही स्वकीयांच्याच पारतंत्र्यातून मुक्त होण्यासाठी झालेली असणार आहे हे विशेष. १९४७ ची क्रांती ही ज्याप्रमाणे एका बाजूला शौर्याची, पराक्रमाची, त्यागाची व बलिदानाची

तर दुसऱ्या बाजूला अन्या अत्याचाराच्या, विषमतेच्या विरोधातील होती. त्याचप्रमाणे २०४७ मधील क्रांती सुद्धा दोन्ही बाजूंनी अर्थपूर्ण असणार आहे. एकूणच वर्तमान काळात सुजाण नागरिकत्वाची भूमिका बजावणाऱ्या प्रत्येक भारतीयाला नकारात्मक अर्थाने आपल्या देशाची वाटचाल करून क्रांतीच्या उंबरठ्यावर नेवून ठेवायचे आहे की, महापुरुषांच्या स्वप्नातील समानतेवर आधारलेली व मानवतेचा संदेश देणारी महासत्ता बनवायची आहे हे ठरवावे लागणार आहे. तेव्हा प्रत्येक भारतीयाने २०४७ मधील ऐतिहासिक शाश्वत भारत- विकसित भारत निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून पावले टाकायला हवीत.

*****